**<u>सं. फौ. ख. क्र.१९१/२०२१</u>**
**लक्ष्मी स्प्रे पेटींग वि. तिरुपती ट्रान्सलाईन**
**<u>निशाणी क्र.२४–अ च्या पुढे.</u>**

**<u>फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ सुभाष शिवाजी जाधव यांचा पुढील सरतपास फिर्यादीचे विधीज्ञ श्री.ए.ए.कोठारी, यांच्यामार्फत शपथेवर सुरु –</u>**

१३. मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.२४–अ वर दाखल केलेले आहे. त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे. मला माझी पत्नी लक्ष्मीबाई जी लक्ष्मी स्प्रे पेटींगची प्रोप्रायटर आहे तिने कुलमुखत्यार पत्र करून दिलेले आहे. आता मला सदर कुलमुखत्यार पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी व माझे पत्नीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.३३</u>** देण्यात येते. आता मला यादी नि.क्र.२४/१ वरील चेक दाखविण्यात आला. तो आरोपीने फिर्यादीस दिला होता. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **<u>नि.क्र.३४</u>** देण्यात येतो. नि.क्र.२४/२ वर मी चेक परत आल्याचा मेमो दाखल केलेला आहे. त्यास **<u>नि.क्र.३५</u>** देण्यात येते. नि.क्र.३/३ वर फिर्यादी यांनी आरोपींना दि.१०/०२/२०२१ रोजी नोटीस पाठविली. आता मला सदर नोटीस दाखविली. त्यावर माझी व माझ्या वकिलाची सही आहे. त्यास **<u>नि.क्र.३६</u>** देण्यात येते. नि.क्र.३/४ वर पोष्टाच्या पावत्या दाखल केलेल्या आहेत. त्यास **<u>नि.क्र.३७</u>** देण्यात येते. आरोपींना नोटीस पाठविली होती. ते न स्विकारल्यामुळे परत आले. त्याचे पाकीट मी नि.क्र.३/५ वर दाखल केलेले आहे. त्यास **<u>अनुक्रमे नि.क्र.३८ व नि.क्र.३९</u>** देण्यात येते. मी नि.क्र.२१ सोबत फिर्यादी कंपनीच्या खात्याचे सन २०१७ ते डिसेंबर २०२० पर्यंतचे स्टेटमेंट दाखल केलेले आहेत.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपी क्र.२ तर्फे उलटतपास श्री. आर. यु. चौधरी, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

१४. मी माझ्या पत्नीला मधुमेह व गुडघेदुखीचा त्रास आहे याचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. खटला माझ्या पत्नीने दाखल केला. काही तारखेला माझी पत्नी हजर होती व काही तारखेला हजर नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी माझ्यापेक्षा दहा ते बारा वर्षांनी लहान आहे. साक्षीदार सांगतो की, पाच वर्षांनी लहान आहे. हे म्हणणे खरे नाही की, मुखत्यारपत्रामध्ये माझे व माझ्या पत्नीचे खोटे वय नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही

की, माझी पत्नी बाहेर हिंडू फिरू शकते. मुखत्यारपत्र इंदापूरात केले. त्यावेळी माझी पत्नी इंदापूरात आली होती. माझ्या फिर्यादीमध्ये २०१७ ते २०२० मध्ये झालेल्या व्यवहाराच्या नेमक्या तारखा, महिना, साल व रक्कम नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून रू.१२,५०,०००/– रूपये येणे लागतात याचा कोणताही कागदोपत्री पुरावा मी दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तिरुपती ट्रान्सलाईनचा व्यवहार आरोपी क्र.३ पाहत होता. आरोपी क्र.१ या कंपनीचे ए.टी.एम.कार्ड आरोपी क्र.३ यांच्या नावावर आहे का कसे मला माहिती नाही. आरोपी क्र.३ ने स्वतःची सही करून आरोपी क्र.१ कंपनीचे ए.टी.एम. कार्ड घेतले का कसे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ यांना पाठविलेल्या नोटीसची पोहोच पावती मी याकामी दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी यांनी आरोपी क्र.२ यांच्या खात्यावर कोणताही व्यवहार केलेला नाही. आरोपी क्र.१ या कंपनीच्या ए.टी.एम.चा लिंक केलेला मोबाईल नंबर हा आरोपी क्र.३ चा आहे.

***(वकीलांच्या तोंडी विनंतीवरून साक्षीदाराचा उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो..)***

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

**(ए. बी. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

**दि.१५/०७/२०२५** इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.